# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १०.०९.२०२६

## नविन अधिकाराचा वापर करत नागपूर ग्रामीण पोलिसांनी राज्यात प्रथम PITNDPS अधिनियमांतर्गत केली स्थानबद्धतेची कारवाई

## अवैध अंमली पदार्थाच्या गुन्हयातील सराईत आरोपी अभिनेश बर्मे उर्फ वर्मा याला PITNDPS अधिनियमांतर्गत केले स्थानबध्द

मा. श्री संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर ,मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारास आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत अवैध अंमली पदार्थाच्या गुन्हयातील सराईत आरोपी अभिनेश उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बर्मे उर्फ वर्मा, वय २७ वर्षे, रा. येरला, ता. जि. नागपूर याच्याविरुद्ध अंमली पदार्थ व मन:प्रभावी पदार्थांच्या अवैध वाहतुकीस प्रतिबंध करणारा अधिनियम, १९८८ (**PREVENTION OF ILLICIT TRAFFIC IN NARCOTIC DRUGS AND PSYCHOTROPIC SUBSTANCES ACT, 1988** ) - **PITNDPS Act** च्या कलम ३(१) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

**PITNDPS** अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेचा आदेश पारित करण्याचे अधिकार यापूर्वी प्रधान सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे होते. दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पारीत झालेल्या नवीन शासन निर्णयानुसार सदर अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक यांना प्राप्त झाल्यानंतर, या अधिकाराचा वापर करीत महाराष्ट्र राज्यात प्रथमच नागपूर ग्रामीण पोलिसांनी **PITNDPS** अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. नागपुर ग्रामीण पोलीसांनी नमुद आरोपी विरुद्ध **PITNDPS** १९८८ च्या कलम ३(१) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर

ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाने सदर प्रस्तावाला मंजुरी देवुन दिनांक ०९/०९/२०२६ रोजी सदर स्थानबद्धता आदेश पारित केला.

दिनांक ०३/०४/२०२६ रोजी एमआयडीसी बुटीबोरी पोलीस ठाणे, नागपूर ग्रामीण गु.र.क्र. १२४/२०२६, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम, सहकलम ३/२५ शस्त्र अधिनियम तसेच कलम ३(१) (ii), ३(२), ३(४) मोक्का अधिनियम अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी बुटीबोरी पोलीस स्टेशन हद्दीत कारवाई करून १) अंमली पदार्थ गांजा १.११४ किलोग्रॅम किंमती २०,०००/—रुपये , २) लोखंडी नळी व लाकडी बट असलेली भरमार बंदुक अग्निशस्त्र किंमती ४०,०००/—रुपये, ३) ०१ मोबाईल किंमती २०,०००/— रुपये, ४) हयुंडाई आय २० कार क्रं एम एच ४६ ए पी ७७२६ किंमती ५,००,०००/— रूपये आणि १९,६४०/— रूपये रोख रक्कम असा एकुण ६,०४,६४०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान नमुद आरोपी नामे अभिनेश उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बर्मे उर्फ वर्मा, वय २७ वर्षे, रा. येरला, ता. जि. नागपूर याचा सहभाग असुन तो संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख तसेच अंमली पदार्थ पुरवठादार असल्याचे तपासातून निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध मोक्का (**MCOCA** )अधिनियमाच्या अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच नमुद आरोपीविरुद्ध यापूर्वी मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ अन्वये सहा महिन्यांची तडीपारी तसेच एमपीडीए अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली होती.

नमुद आरोपी अभिनेश उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बर्मे उर्फ वर्मा, वय २७ वर्षे, रा. येरला, ता. जि. नागपूर याच्याविरुद्ध सन २०२२ पासून आजपावेतो एनडीपीएस कयादयान्वये एकूण ०६ गुन्हे दाखल आहेत. १) हुडकेश्वर पोलीस ठाणे,

नागपूर शहर  अपराध क्र. २१२/२०२२, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम. **२) गिट्टीखदान पोलीस ठाणे,** नागपूर शहर अपराध क्र. २२६/२०२४, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम**,३) कळमेश्वर पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण  अपराध क्र. ४६८/२०२५, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम.**४) कळमेश्वर पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण अपराध क्र. ४८१/२०२५, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम. **५) कळमेश्वर पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण अपराध क्रं. २२७/२०२६, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम आणि **६)एमआयडीसी बुटीबोरी पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण अपराध क्रं १२४/२०२६, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम, सहकलम ३/२५ शस्त्र अधिनियम तसेच कलम ३(१)( ii ), ३(२), ३(४) मोक्का अधिनियम अन्वये एकुण ०६  गुन्हे दाखल आहे.

**अनेक प्रतिबंधात्मक कारवायांनंतरही आरोपीचा अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारातील सहभाग सुरू तसेच त्याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवल्याचे निदर्शनास आले.आरोपीची सातत्यपूर्ण गुन्हेगारी प्रवृत्ती, अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारातील सहभाग, संघटित गुन्हेगारीशी असलेला संबंध तसेच समाजाच्या सुरक्षिततेस निर्माण होणारा संभाव्य धोका लक्षात घेऊन त्याच्याविरुद्ध PITNDPS अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असुन त्याला स्थानबध्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**



अभिनेश उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बर्मे उर्फ वर्मा

# In a first, Nagpur Rural cops use new anti-drug detention

## 27-Yr-Old Alleged Supplier From Kalmeshwar In Net

Soumitra.Bose@timesofindia.com

**Nagpur:** In a likely first for Maharashtra after the delegation of powers under Prevention of Illicit Traffic in Narcotic Drugs and Psychotropic Substances (PITNDPS) Act, 1988, Nagpur Rural police have secured preventive detention of a 27-year-old alleged drug supplier from Kalmeshwar, described by investigators as the kingpin of an organised narcotics network.

The action assumes significance as, until a govt resolution issued on Sept 4, the authority to pass detention orders under PITNDPS Act rested exclusively with principal secretary (Home). The new notification vested the power in special inspector general of police (IGP), enabling field units to directly pursue such proposals through police hierarchy.

Thus, Nagpur Rural police became the first police unit in the state to invoke the law under the revised framework. Special IGP, Nagpur Range, Sandip Patil, issued the detention order on Sept 9 against Abhinesh alias Abhishek alias Anna Barme alias Verma, a resident of Yerla village in Kalmeshwar, who has previously faced charges under Maharashtra Control of Organised Crime Act (MCOCA).

### CAUGHT IN THE ACT



- Nagpur Rural police have secured preventive detention of a 27-year-old alleged drug supplier from Kalmeshwar
- Before a GR was issued on Sept 4, the authority to pass detention orders under PITNDPS Act rested exclusively with principal secretary (Home)
- The new notification vested the power in special IGP, enabling field units to directly pursue such proposals through police hierarchy
- Nagpur Rural police became the first police unit in the state to invoke the law under the revised framework
- Police booked the accused under NDPS Act, Arms Act and MCOCA

The proposal was prepared by superintendent of police Harssh A Poddar and additional SP Anil Mhaske.

The immediate trigger was a case registered at MIDC Butibori police station on April 3 this year. During the investigation, the local crime branch had seized around 1kg ganja worth ₹20,000, a country-made firearm valued at ₹40,000, a mobile phone worth ₹20,000, a car valued at ₹5 lakh and cash. The total seizure was estimated at around ₹5 lakh.

Police booked the accused under the provisions of the NDPS Act, Arms Act and MCOCA, alleging that he was operating an organised drug-supply network.

According to investigators, Barme has been named in six NDPS cases since 2022, including offences registered at Hudkeshwar, Gittikhadan, Kalmeshwar and Butibori police stations.

Police records show that he had earlier been externed for six months and was also detained under Maharashtra Prevention of Dangerous Activities (MPDA) Act. "Despite several preventive measures, the accused continued illegal drug trafficking and criminal activity," an official stated.

Citing his repeated involvement in narcotics offences, alleged links with organised crime and perceived threat to public safety, Nagpur Rural police forwarded a proposal through SP Poddar to special IGP, who subsequently approved the detention under the PITNDPS Act.

TheHitavada
Nagpur City Line | 2026-09-11 | Page- 2
ehitavada.com

# Nagpur Rural Police take State's first PITNDPS action

■ **Staff Reporter**

NAGPUR Rural Police has taken the first detention action in Maharashtra under the Prevention of Illicit Traffic in Narcotic Drugs and Psychotropic Substances (PITNDPS) Act, 1988. Abhinesh alias Abhishek alias Anna Devshankar Barme alias Verma (27), of Yerla in Nagpur district, has been detained under the Act for his alleged involvement in the illegal drug trade. The detention order was passed on September 9 by Special Inspector General of Police, Nagpur Range, Sandeep Patil. The action was taken after Nagpur Rural Police submitted a proposal under Section 3 of the PITNDPS Act.

Earlier, the power to issue detention orders under the Act rested with the Principal Secretary, Home Department, Maharashtra Government. A Government decision dated September 4, 2026, transferred the power to Special Inspectors General of Police. Nagpur Rural Police has now used power for the first such action in the State.

The action follows a major drug seizure by Local Crime Branch within the MIDC Butibori police station limits on April 3. Police seized 114 kg of ganja, valued at Rs 20,000, along with firearms, a Hyundai i20 car and other materials. Barme was identified as a key member of an organised criminal gang and a drug supplier. Police also invoked the Maharashtra Control of Organised Crime Act (MCOCA) against him. Police said Barme has six NDPS cases registered against him since 2022.

These include cases registered at Hudkeshwar and Gittikhadan police stations in Nagpur city and Kalmeshwar and MIDC Butibori police stations in Nagpur Rural. He was earlier externed or detained under preventive laws. Police said he had also been sent to jail for six months under Section 56 of the Maharashtra Police Act and detained under the Maharashtra Prevention of Dangerous Activities (MPDA) Act. Police found that he allegedly continued his activities in the illegal drug trade. Considering his repeated involvement in drug-related offences, alleged links with organised crime and the potential threat to public safety, Nagpur Rural Police proposed preventive detention under the PITNDPS Act. The detention process is now underway. The operation was carried out under guidance of Sandeep Patil, Special Inspector General of Police, Nagpur Range, Senior Superintendent of Police Dr Harssh A Poddar and Additional Superintendent of Police Anil Mhaske.

तरुण भारत
Nagpur Pages | 2026-09-11 | Page- 1
epaper.tarunbharat.net

# राज्यात प्रथमच ‘पीआयटीएनडीपीएस’ कायद्यांतर्गत स्थानबद्धता

**▮ नागपूर ग्रामीण पोलिसांचा मास्टरस्ट्रोक ▮ नवीन अधिकारांचा केला वापर ▮ बुटीबोरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत कारवाई**

**नागपूर, १० सप्टेंबर**

अवैध अमली पदार्थांच्या व्यापाराला आणि संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांनी अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. अमली पदार्थांच्या गुन्ह्यांतील सराईत व कुख्यात आरोपी अभिनेश ऊर्फ अभिषेक ऊर्फ अण्णा देवशंकर बर्मे ऊर्फ वर्मा याच्याविरुद्ध राज्यात प्रथमच ‘पीआयटीएनडीपीएस’ अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची मोठी कारवाई करण्यात आली आहे. नवीन अधिकारांच्या अंमलबजावणीनंतर नागपूर ग्रामीण पोलिसांनी घेतलेला हा पहिलाच राज्यस्तरीय धाडसी निर्णय ठरला आहे.

## गुन्हेगारी साम्राज्याचा म्होरक्या आणि बुटीबोरी प्रकरणातील सहभाग

मुख्य आरोपी अभिनेश ऊर्फ अभिषेक ऊर्फ अण्णा देवशंकर बर्मे (२७, रा. येरला, ता. जि. नागपूर) हा संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख तसेच मोठा अमली पदार्थ पुरवठादार आहे. ३ एप्रिल रोजी एमआयडीसी बुटीबोरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई केली होती. यात १.११४ किलो गांजा, ४०,००० रुपयांची बंदूक, मोबाईल, एक कार आणि १९,६४० रुपयांची रोकड असा एकूण सहा लाख चार हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या प्रकरणात मोक्का अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, यापूर्वी त्याच्यावर तडीपारी आणि एमपीडीए अंतर्गतही कारवाई झाली होती. ■

यापूर्वी पीआयटीएनडीपीएस अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेचा आदेश पारित करण्याचे अधिकार केवळ प्रधान सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे होते. मात्र, ४ सप्टेंबर रोजी पारित झालेल्या नवीन शासन निर्णयानुसार हे अधिकार विशेष पोलिस महानिरीक्षकांना प्राप्त झाले. या नवीन अधिकारांचा तातडीने वापर करत, नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, नागपूर ग्रामीणचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी हा जबरदस्त दणका दिला आहे. नागपूर ग्रामीण पोलिसांनी प्रस्ताव तयार करून वरिष्ठ पोलिस अधीक्षकांच्या मार्फत विशेष पोलिस महानिरीक्षकांकडे सादर केला होता, ज्याला मंजुरी देत ९ सप्टेंबर रोजी हा स्थानबद्धता आदेश पारित करण्यात आला.

◀ (तभा वृत्तसेवा)

## तब्बल सहा गंभीर गुन्हे दाखल

आरोपी अभिनेश बर्मे याच्यावर २०२२ पासून आजपर्यंत एनडीपीएस कायद्यान्वये नागपूर शहर व ग्रामीणमध्ये एकूण ६ गंभीर गुन्हे नोंद आहेत. अनेक प्रतिबंधात्मक कारवाया करूनही आरोपीने आपली गुन्हेगारी वृत्ती आणि अमली पदार्थांचा अवैध व्यापार सुरूच ठेवला होता. त्याच्या सातत्यपूर्ण गुन्हेगारीमुळे समाजाच्या सुरक्षिततेला निर्माण झालेला धोका लक्षात घेता, पोलिसांनी अत्यंत कठोर पावले उचलत त्याच्याविरुद्ध ही प्रभावी स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. ■

Powered by Bharati Web